# Good Work Of Nagpur Rural Police

## विशेष पथक नागपूर (ग्रामीण),ची
## ऑनलाईन लॉटरी अडयावर धाड

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 8 किमी अंतरावर मौजा दहेगाव येथे दिनांक 6/11/2017 चे 19.00 वा. दरम्यान विशेष पथक नागपूर ग्रामीणचे परिविक्षाधीन पोलीस उपअधिक्षक श्री. विशाल ढुमे, यांना पेट्रोलिंग दरम्यान गुप्त माहिती मिळाली की, काही इसम ऑनलाईन सटयाचा जुगारचा खेळ खेळत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन विशेष पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून छापा घातला असता आरोपी नामे – 1) संजीव सत्यनारायण सिंग, वय 32 वर्ष, रा. वलनी माईन्स 2) प्रमोद बाळकृष्ण आमदरे, वय 37 वर्ष, रा. दहेगाव रंगारी हे वरील नमुद घटनास्थळी ऑनलाईन लॉटरी जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातुन नगदी 3,500/– रूपय व 06 मॉनिटर किर्बोड, माऊस, वाय फाय डिव्हाईस, मोबाईल सह एकुण किमती 58,535/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणी विशेष पथक नागपूर ग्रामीण पोलीसांनी पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 12, 4 (ख) महाराष्ट्र जुगार कायदया सह कलम 130 महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांना अटक करण्यात आलेली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. बंडु कोकाटे हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामीण) पोलीस अधिक्षक श्री. शैलेश बलकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकचे परिविक्षाधीन पोलीस उप अधिक्षक श्री. विशाल ढुमे, पोहवा श्री. महेन्द्र सरपटे, पोशि श्री. श्रीकांत पांढरे, श्री. कार्तिक पुरी, श्री. धोंडीबा नागरगोजे, चालक पोना श्री. चंद्रशेखर शेंडे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



विशेष पथक पोलीस नागपूर ग्रामीणचे पोलीस उपअधिक्षक सह कर्मचारी हे खापरखेडा येथील जुगारातील दोन अटक आरोपीतांसह

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**